# महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळासाठी शासकीय / निमशासकीय सेवेतून गट अ (कमीत-कमी उप सचिव) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १. | गट-अ (कमीत-कमी उप सचिव) | १- महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या भरती नियमांचा मसुदा तयार करणे आणि मंडळाकडून मंजुरी मिळविण्यासाठी त्यांचे दस्तऐवज.<br>२- नवीन मानव संसाधन धोरणानुसार राज्य रोस्टर, बिंदू नामावली तयार करणे आणि मंडळाकडून मंजुरी मिळविण्यासाठी त्यांचे दस्तऐवज.<br>३- सध्याच्या कर्मचाऱ्यांचे नवीन मानव संसाधन धोरण आणि नवीन वेतनश्रेणीनुसार विद्यमान कर्मचाऱ्यांचा फिटमेंट अहवाल तयार करणे आणि मंडळाकडून मंजुरी मिळविण्यासाठी त्यांचे दस्तऐवज.” | गट-अ (कमीत-कमी उप सचिव) पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव. संगणकाचे ज्ञान, तसेच आस्थापनासंबधीत, सेवाविषयक अनुभव असलेल्यांना प्राधान्य.<br>वयोमर्यादा - ५८ ते ६५ वर्षे |

नियुक्तीच्या अटी व शर्ती -

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ अन्वये नियुक्तीच्या अटी व शर्ती विनयमित करण्यात येतील.

२. हा करार फक्त ३ महिन्याचा कालावधी करिता आहे आणि ३ महिन्या मध्ये वरील काम पूर्ण करून देणे आवशक आहे.

३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

५. इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह हि जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. १८.०३.२०२५ पर्यंत rupali.gaikwad@mahait.org या ई-मेल आयडीवर सादर करावेत.